# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

*जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर*
*४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.*
*फोन नं.२६४७ ४८१२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६११*

ई-मेल- jtdirrom@gmail.com संकेतस्थळ - www.jdteromumbai.com

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-४/२०१५/ २०६१
दिनांक 22 JUN 2016

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अनुदानीत संस्था
शासकीय औषध निमार्णशास्त्र पदविका संस्था,
व विनाअनुदानीत पदवीका संस्था.

विषय – शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या व्दित्तीय वर्षात अभ्साक्रमात बदल/ स्थलांतराने संस्थाबदल करण्याबाबत

संदर्भ:- १. संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/संस्था स्थलांतर/ /२०१६/६६२ दि.२२.०६.२०१६

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, या विभागा अंतर्गत येणा-या अभियांत्रिकी व औषधनिमार्ण शास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणा-या शासकीय, शासकीय अनुदानीत व विना अनुदानीत संस्थांनी संदर्भाकिंत पत्रात दिलेल्या निर्देशानुसार आपल्या संस्थेत प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम बदल अथवा स्थलांतराने संस्थांबदल करावयाचा असल्यास **संदर्भीय पत्रात दिलेल्या निर्देशाचे पालन करुन आवश्यकती कार्यवाही दि. २५.०६.२०१६ पर्यत पुर्ण करण्यात यावी.** त्याबाबतचे आवश्यक ते निर्देश स्थलांतरीत विद्यार्थ्यांना देण्यात यावेत.

सहपत्र :- संदर्भीय पत्राची प्रत

सहसंचालकयांचे करीता
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत:- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहिती करीता सादर

Z:\Admission 12-13\Engg. Dip\Dip.Adm 2013-14.docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gamil.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादित
ईमेलव्दारे

जा.क्र.10/एनजीपी/ संस्था स्थलातर/2016/ ६६२
दिनांक : 22.06.2016

प्रति,
1)सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे
2) प्राचार्य,
सर्व शासकीय/शासकीय अनुदानित/
खाजगी विनाअनुदानित पदविका अभियांत्रिकी
तंत्रनिकेतने, महाराष्ट्र राजय.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या व्दितीय वर्षात अभ्यासक्रमात बदल / स्थलांतराने संस्थाबदल करण्याबाबत.....
संदर्भ- अवर सचिव, प्रवेश नियंत्रण प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि. 08.06.2016 रोजीचे बैठकीचे इतिवृत्त

उपरोक्त विषयाच्या संदर्भात कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया मा. आयुक्त व सक्षम प्राधिकारी, महाराष्ट्र शासन, राज्य सामाईक परीक्षा कक्ष, मुंबई यांचे मार्फत राबविण्यात येत असून संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सक्षम प्राधिकारी यांचे नियंत्रणाखाली सदर प्रवेश प्रक्रियासाठी नोडल ऑफीसर म्हणून काम पहात आहेत.

शैक्षणिक वर्ष 2016-17 साठी पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या थेट व्दितीय वर्षाची प्रवेशप्रक्रिया सुरु होत असून, सदर प्रवेशासाठीचे ऑप्शन फॉर्म भरण्यापुर्वी एकाच संस्थेतील इच्छूक विद्यार्थ्यांचे त्याच संस्थेत अभ्यासक्रम शाखाबदल अथवा प्रथम वा व्दितीय पाळी बदला करीता जागांचे उपलब्धतेनुसार प्रथम वर्षातील गुणवत्तेचे आधारे संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांनी सदरची कार्यवाही त्यांचे स्तरावरुन करावयाची आहे. सदर अभ्यासक्रम शाखा बदलासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने ठरवून दिलेले पात्रता निकषानुसार व्दितीय वर्षात शाखा बदल केले जात आहेत याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांची आहे. तसेच अशा शाखा बदलांची सविस्तर यादी प्रवेश नियंत्रण प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना देण्यात यावी व त्याची प्रत या संचालनालयास सादर करावी.

प्रथम वर्षानंतर विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम शाखा/ संस्थाबदलासाठी खालीलप्रमाणे पद्धती अवलंबण्यात यावी (महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, क्रमांक 77,( Notification) दिनांक : 11.3.2016 मधील नियम क्रमांक 16 व शैक्षणिक वर्ष 2016-17 चे प्रवेश माहिती पुस्तिका नियम क्र. 20 पहावा.)

- विद्यार्थी प्रथम वर्ष किंवा प्रथम आणि व्दितीय सत्र पुर्ण उत्तीर्ण किंवा एका विषयात अनुत्तीर्ण असल्यास अभ्यासक्रम बदल किंवा संस्थाबदलास पात्र आहे.

- खाजगी विनाअनुदानित संस्थेमधुन शासकीय किंवा शासकीय अनुदानित संस्थेत विद्यार्थ्यास संस्थाबदल करता येणार नाही. तथापि, विद्यार्थी शासकीय अथवा शासकीय अनुदानित संस्थेतून खाजगी विनाअनुदानित संस्थेत संस्थाबदल करु शकेल.

- स्वायत्त संस्थेमध्ये इतर संस्थेतील विद्यार्थ्यांना संस्थाबदल करता येणार नाही.

- खाजगी विनाअनुदानित संस्थेत संस्थाबदलाने प्रवेश :-

  खाजगी विनाअनुदानित संस्थेच्या प्राचार्यांनी त्यांचे संस्थेत दुसऱ्या संस्थेतील विद्यार्थ्यांना संस्थाबदलाने प्रवेश देण्यासाठी दुसऱ्या संस्थेचे नाहरकत प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संबंधीत अभ्यासक्रमासाठी पात्रता प्रमाणपत्र व ज्या संस्थेत संस्था बदलाने प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संस्थेतील दुसऱ्या वर्षातील संबंधीत अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांचा तपशील सादर करुन प्रवेश नियंत्रण प्राधिकरण यांची पुर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. ज्या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यास प्रवेश देण्यात येणार आहे, त्यासाठीचे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे पात्रता निकषांची पूर्तता होत आहे याची पडताळणी संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांनी करावयाची आहे. ज्या संस्थेत संस्था बदलाने प्रवेश घ्यावयाचा आहे त्या संस्थेच्या प्राचार्यांच्या लेखी शिफारशी असलेले अर्जांचाच प्रवेश नियंत्रण प्राधिकरण विचारात घेईल.

  **तथापी विना अनुदानित संस्थेतील संस्था बदल/शाखा बदल याबाबतची कार्यवाही प्रवेश नियंत्रण प्राधिकरण यांची पुर्व मान्यता घेऊन संबधित संस्थांच्या प्राचार्यानी विहीत कालावधीत पूर्ण करावयाची आहे.**

- शासकीय किंवा शासकीय अनुदानित संस्थेत संस्थाबदलाने प्रवेश :-

  शैक्षणिक वर्ष 2016-17 साठी शासकीय किंवा शासकीय अनुदानित संस्थेतील पात्र इच्छुक विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या शासकीय किंवा शासकीय अनुदानित संस्थेत संस्थाबदल अथवा अभ्यासक्रम बदलाबाबतची प्रवेशासाठीची कार्यवाही या संचालनालयाच्या संबधित विभागीय कार्यालयामार्फत पदविका अभ्यासक्रमाच्या माहितीपुस्तिकेतील नियम क्र. २० (२) मध्ये नमुद केल्या प्रमाणेच विहीत कालावधीत पूर्ण करावयाची आहे. तथापी आंतरविभागीय बदली बाबत या संचालनालयाकडुन मान्यता देण्यात येईल. त्याप्रमाणे असे प्रस्ताव या संचालनालयास योग्य त्या कागदपत्रासह diplomadesk10dte@gmail.com या ईमेल आयडीवर तात्काळ पाठविण्यात यावेत.

  **तसेच थेट व्दितीय वर्षाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेसाठी संचालनालयास रिक्त जागांचा तपशिल सादर करण्यापुर्वी दि. २५.०६.२०१६ पर्यंत सदरहु कार्यवाही पुर्ण करावयाची आहे. त्यानंतर पोस्ट एस. एस. सी. थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रीयेसाठी अभ्यासक्रम निहाय रिक्त जागांचा तपशिल संस्थेच्या लॉगीन मधुन ऑनलाईन पध्दतीने या संचालनालयास दि. 27 जुन 2016 दुपारी 3.00 वाजेपर्यंत कळविण्यात यावा.**

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : प्रणाली व्यवस्थापक, मुख्य कार्यालय, कार्यासन क्र. 3 आय टी सेल यांना माहीती व पुढील आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित. तसेच त्यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या संचालनालयाचे संकेत स्थळावर तात्काळ प्रसिध्द करावे. तसेच संस्था निहाय, अभ्यासक्रम निहाय थेट व्दितीय वर्ष पदविका प्रवेशासाठी रिक्त जागांचा तपशिल ऑनलाईन प्रत्येक संस्थेकडून विहीत मुदतीत प्राप्त होत आहे याची खात्री करावी.